## विविध मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या मूकबधिर अपंगावर पोलिसांचा लाठीहल्ला

# जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर

**बोर्ली मांडला :** विविध मागण्या वारंवार सरकारकडे मांडूनही पूर्ण होत नसल्याने पुणे येथील अपंग आयुक्त कार्यलयासमोर आंदोलन करत असलेल्या कर्णबधिर,मूकबधिर अपंगावर मोर्चावर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगावर वर्ण उठले आहेत. यासंदर्भात रायगड जिल्ह्यातील कर्णबधिर,मूकबधिर अपंगानी ज्यांनी लाठीहल्ला केला आहे त्याच्यावर कारवाई करण्याची मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे अपंग संघर्ष समितीच्या वतीने निवेदनाद्वारे केली आहे.

विविध मागण्यांसाठी सोमवारी पुण्याच्या समाजकल्याण आयुक्तालयासमोर आंदोलन करणाऱ्या मूकबधिरांवर पोलिसांनी अमानुष लाठीहल्ला केला. मोर्चाला परवानगी नसल्याचे सांगत पोलिसांनी त्यांना गुरासारखे झोडपले. या मूकबधिरांकडे विरोध करण्यासाठी शब्द नव्हते. ते फक्त किंचाळत होते. ज्यांना आवाज नाही त्यांचा आवाजच दडपून टाकण्यात आला. सैरभैर झालेली मुले वेदनेने विव्हळत होती. पोलिसांचे दांडके बोलत होते. त्यात कुणाच्या पाठीवर वळ उठले तर कुणाचे ढोपर फुटले इतका अत्याचार होऊनही या मूकबधिरांनी आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार केला आहे.

विविध मागण्या वारंवार सरकारकडे मांडूनही पूर्ण होत नसल्याने आंदोलन करत असलेल्या कर्णबधिर विद्यार्थ्यांच्या मोर्चावर पोलिसांनी अमानुष लाठीमार केला. पोलिसांनी केलेल्या लाठीहल्ल्यामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगावर वर्ण उठले आहेत. विद्यार्थ्यांनी विविध मागण्या पूर्ण न झाल्यास आगामी लोकसभा निवडणुकीवर बहिष्कार घालण्याचा इशारा दिला आहे. विद्यार्थ्यांवर पुणे येथील बंडगार्डन पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मुजावर आणि त्यांच्या कर्मचारी यांनी अमानुष पणे लाठीमार केल्याने ते सैरावैरा पळत सुटले. यावेळी बरेच विद्यार्थी एकमेकांवर कोसळले. आणि शेकडो अपंग हे जखमी झाले आहेत.

समाजकल्याण कार्यालयावर ठिय्या मांडलेल्या कर्णबधिर विद्यार्थ्यांचे आंदोलन दुसऱ्या दिवशी सुद्धा सुरूच असून अद्याप कुठलाही तोडगा निघू शकलेला नाही.विद्यमान अपंग आयुक्त यांची बदली रद्द करण्यात यावीसांकेतिक भाषेत आम्हाला शिक्षण मिळावं, नोकरीच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या मागणी साठी अपंग आयुक्त कार्यालयावर कर्णबधिर मूकबधिर अपंग मोर्चा घेऊन आले होते. पोलिसांशी झालेल्या गैरसमाजातून या विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला होता.

समाजकल्याण कार्यालयावर ठिय्या मांडलेल्या कर्णबधिर विद्यार्थ्यांचे आंदोलन दुसऱ्या दिवशी सुद्धा सुरूच असून अद्याप कुठलाही तोडगा निघू शकलेला नाही. सामाजिक न्याय राज्यमंत्री दिलीप कांबळे यांनी मंगळवारी सकाळी या विद्यार्थ्यांची भेट घेतली. सध्या कांबळे यांची समाजकल्याण आयुक्तांसोबत बैठक सुरु असून त्यातून काय तोडगा निघतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान जोपयर्ंत अधिवेशनात कुठली घोषणा होत नाही तोपयर्ंत दिलीप कांबळे या अपंगांना कुठलेही आश्वासन देणार नाहीत असा अंदाज वर्तवण्यात येत आहे.



पुणे येथे अपंगावर झालेल्या पोलीस हल्ल्याच्या निषेधार्थ अलिबाग मुरूड मधील काही मूकबधिर कर्णबधिर अपंग हे अलिबाग शहरात फलक घेऊन फिरत असताना त्यांच्याकडे युवक काँग्रेसचे उमेश ठाकूर आणि सेनेचे जिल्हाप्रमुख किशोर जैन वगळता कोणत्याही पक्षाच्या पदाधिकारी यांनी भेट घेण्याचे साधे सौजन्यही दाखवले.अशी खंत काही अपंगानी व्यक्त केली.

# आमदारांच्या खोल्यांमध्ये आंघोळीसाठी रांगा

## एका खोलीत राहतात चार आमदार

**मुंबई :** मनोरा आमदार निवासातून आमदारांना काढले. त्यांच्या राहण्याची सोय नाही. दुसऱ्या आमदार निवासांमध्ये एकाच खोलीत चारचार आमदार राहतात. अधिवेशनामुळे त्यांच्या खोल्यांत कार्यकर्त्यांची गर्दी आहे. आंघोळीसाठी आमदारांना रांग लावावी लागते, अशा शब्दात सर्वपक्षीय आमदारांनी आज विधानसभेत तीव्र नाराजी व्यक्त केली.

विधानसभेत पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी आमदार मनीषा चौधरी यांनी निवासाच्या गैरसोयीचा मुद्दा मांडला. धोकादायक मनोरा आमदार निवासाची इमारत पाडण्यास सुरूवात झाल्याने आमदारांची गैरसोय होत आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेत २६ महिला आमदार आहेत. विधानमंडळाने आमची निवासाची गैरसोय दूर करावी यासाठी आम्ही विधानमंडळ सचिवांची भेट घेतली. निवासासाठी हॉटेलचे १८ हजार रुपये भाडे आम्हाला परवडणारे नाही. त्यामुळे महिला आमदारांची प्रधान्याने राहण्याची व्यवस्था करावी अन्यथा सरकारने भाडे द्यावे, अशी मागणी चौधरी यांनी केली.

काँग्रेसचे वीरेंद्र जगताप, शिवसेनेच्या सुभाष साबणे यांनी आकाशवाणी आमदार निवासातील गैरसोयींकडे सरकारचे लक्ष वेधले. मनोरा आमदार निवास इमारत पाडण्यास सुरूवात झाल्याने बहुतांश आमदार, कार्यकर्ते आकाशवाणी आमदार निवासात आले आहेत. एकाच खोलीत चार आमदार राहत आहेत.

याशिवाय गावाकडून मंत्रालयात कामानिमित्त येणारे कार्यकर्ते गर्दी करतात. आंघोळीसाठी रांगेत उभे राहावे लागते, असे साबणे म्हणाले. तर काँग्रेसच्या जयकुमार गोरे यांनी आकाशवाणी आमदार निवासासमोरील रस्त्यावर प्रचंड वाहतूककोंडी होत असल्याची तक्रार करत तेथे वाहतूक पोलीस नेमण्याची मागणी केली.

## केंद्र शासनाच्या स्वच्छ सर्वेक्षण २०१९ या अभियान

# खोपोली पालिका २ पुरस्काराची मानकरी

**खोपोली :** स्वच्छ सर्वेक्षण २०१९ या केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी बजावलेल्या खोपोली नगरपालिकेला केंद्र शासनाने दोन पुरस्काराची घोषणा केली. ६ मार्चला राष्ट्रपतींच्या उपस्थितीत केंद्रीय नगरविकास मंत्र्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण होणार आहे. या संबधीचे पत्र मुख्याधिकारी याना मंगळवारी प्राप्त होताच नगराध्यक्षा सुमनताई औसरमल व मुख्याधिकारी संजय शिंदे यांनी तातडीने आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत या पुरस्काराचे वृत्त सांगताच उपस्थित सर्वानीच पालिका प्रशासनाचे कौतुक केले. छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत नगराध्यक्षा सुमन औसरमल यांनी पुरस्काराची बातमी सांगताच सभागृहात बाके वाजवून उपस्थितांनी अभिनंदन केले.

नगराध्यक्षा सुमन औसरमल यांनी हा पुरस्कार मिळविण्यासाठी मुख्याधिकारी, अधिकारी, कर्मचारी,



लोकप्रतिनिधी, पत्रकार तसेच नागरिकांचे आभार मानले. सर्वांच्या सहकार्यातून केंद्र शासनाचा पुरस्कार खोपोली पालिकेत मिळत असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला व पुढे भविष्यात असेच सहकार्य करण्याविषयी आवाहन केले. मुख्याधिकारी संजय शिंदे यांनी या अभियानात सहकार्य करणाऱ्यांचे आभार मानताना, आरोग्य विभागातील कर्मचारी, अधिकारी वर्ग व संगणक कर्मचारी याना शाबासकी दिली. मागील सर्वेक्षणात आपण कमी पडलो पण यावेळी सर्व जणांनी खूप मेहनत घेतली लोकप्रतिनिधी, पत्रकार, नागरिक यांनी विशेष सहकार्य केले. या यशामागे सर्वांची मेहनत असल्याचे सांगून कोकणात खोपोली व रत्नागिरी पालिकेला हा पुरस्कार मिळाल्याची माहिती त्यांनी सांगीतली. ६ मार्च ला पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर त्यासंबधी तपशील समजेल असेही त्यांनी सांगितले. दोन पुरस्कारापैकी स्वच्छ सर्वेक्षण १०१९ अंतर्गत महाराष्ट्रात १३ महानगरपालिका व नगरपालिकेत मध्ये खोपोलीचा ७ वा क्रमांक लागतो. तसेच अन्य पुरस्कार गार्बेज फ्री सिटी हाही महाराष्ट्रात १२ महानगर व नगरपालिका मिळाला या यादीत खोपोली ६ व्या क्रमांकावर असल्याची पण महिती त्यांनी दिली. सर्वांच्या सहकार्यातून हे पुरस्कार मिळत असलाबद्दल त्यांनी सर्वांचेच आभार मानले. यावेळी सभागृहात पेढा व मिठाईचे वाटप करण्यात आले. यावेळी काही मोजकेच नगरसेवक व नगरसेविका उपस्थित होत्या.



भेंडखळ ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ. सोनाली कौस्तुभ ठाकुर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना सरपंच भाग्यश्री चव्हाण, सदस्य किशोर ठाकुर, लक्ष्मण ठाकुर, रतन ठाकुर, संध्या दिपक ठाकुर, नीलम हासुराम भोईर, स्वाती घरत, नीता ठाकुर, योगिता ठाकुर, सुचित्रा ठाकुर, ग्रामविस्तार अधिकारी दिलीप तुरे व इतर (विहंग आर्ट).

## हभप फणसे महाराज, भरतशेठ गोगावले, नरेश म्हस्के, प्रवीण दरेकर यांना

# महाड-पोलादपूर भूषण पुरस्कार जाहीर

**ठाणे** - हभप बाळासाहेब फणसे महाराज, महाडचे आमदार भरतशेठ गोगावले, ठाणे शिवसेना जिल्हाप्रमुख व ठामपाचे सभागृह नेते नरेश म्हस्के, भाजपाचे आमदार प्रवीण दरेकर यांना यंदाचा महाड-पोलादपूर भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. महाड-पोलादपूर तालुका रहिवासी संघाच्या वतीने हे पुरस्कार देण्यात येणार आहे. संघाचे अध्यक्ष तुळशीराम पोळ व कार्याध्यक्ष हनुमंत गोळे यांनी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या महाड-पोलादपुरच्या सुपुत्रांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची नुकतीच घोषणा केली. येत्या 3 मार्च रोजी केंद्रीयमंत्री ना.अनंत गीते व ठाणे जिह्याचे पालकमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.

महाड-पोलादपूर भूषणप्रमाणेच उद्योजक सुभाष निकम, ठाणे जिल्हा केबल सेनेचे अध्यक्ष मंगेश वाळंज, विजय भोसले, विजय मालुसरे, अशोक सतेरे, सौ. संध्या चंद्रकांत दिघे, मनोहर गं. मोरे यांना महाड-पोलादपूर उद्योग रत्न, प्रमोद गोगावले, सुभाष पवार, सुमित फणसे, दिलीप जाधव यांना महाड-पोलादपूर समाजरत्न, तन्मय मालुसरे, डॉ. तितिक्षा पोळ, मनिष देवे , कु.पुजा अशोक झांजे, डॉ. विशाल दळवी यांना महाड-पोलादपूर रत्न तर रामचंद्र धनावडे यांना महाड-पोलादपूर सहकार रत्न व सादुराम मालुसरे यांना महाड-पोलादपूर कामगार रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. पत्रकार नितीन हासे, साहित्यिक, कवी भरत मोळावडे व सामाजिक कार्यकर्त्या मधुरा कदम यांच्या निवड समितीने पुरस्कारासाठी वरील नावांची निवड केली आहे.

महाड-पोलादपूर तालुका रहिवासी संघाचे 21 वे वार्षिक कौटुंबिक स्नेहसंमेलन येत्या रविवार दि. 3 मार्च 2019 रोजी कळवा येथील सायबा हॉलमध्ये दुपारी 4 ते रात्री 9 वा. या वेळेत आयोजित करण्यात आले आहे. त्यावेळी वरील पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे.या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री ना.अनंत गीते, ठाणे जिह्याचे पालकमंत्री ना. एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार



हभप फणसे महाराज | भरतशेठ गोगावले | नरेश म्हस्के | प्रवीण दरेकर

राजन विचारे,आमदार जितेंद्र आव्हाड, शिवसेना कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, माजी उपमहापौर गणेश साळवी, ठामपाचे विरोधी पक्षनेते मिलिंद पाटील, नगरसेवक उमेश पाटील, महाड पंचायत समितीच्या सभापती सपना मालुसरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.यावेळी लहान मुलांचे सांस्कृतिक कार्यक्रम, महिलांसाठी पैठणीचा खेळ,विविध स्पर्धा तसेच लेखक-दिग्दर्शक किरण नाकती यांच्या अभिनय कट्टा व दिव्यांग कला केंद्र संचालित स्पेशल धमाल हा मनोरंजनाचाकार्यक्रम होणार आहे. यावेळी मराठी सिनेसृष्टीतील नामवंत कलाकार उपस्थित राहणार आहेत. तरी या कार्यक्रमास महाड-पोलादपूरवासीयांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष तुळशीराम पोळ यांनी केले आहे.

# रिक्षाच्या अपघातात चालक ठार, दोन जखमी



**खालापूर :** अवघड वळणावर रिक्षा चालक श्रीराम नामदेव राणे (वय 33, रा. कूसगाव बदलापूर) याचे रिक्षावरिल नियंत्रण सुटल्याने झाडाला रिक्षा धडकून झालेल्या अपघातात श्रीराम राणे याचा जागीच मृत्यू झाला तर दोन प्रवाशी जखमी झाले आहेत. हि घटना चौक कर्जत राज्यमार्गावर सोमवारी संध्याकाळी घडली. फिर्यादी मुन्ना शेख याने पोलीसाना दिलेल्या माहितीनुसार शेख आणि त्याची मैत्रिण साक्षी श्रीराम याचे रिक्षातून कर्जतहून चौक कडे निघाले होते. खालापूर हद्दीत वडविहिर गावानजीक रिक्षाचालक श्रीराम याचे वळणावर रिक्षावरिल नियंत्रण सुटून रिक्षा झाडाला जावून धडकली. या अपघातात रिक्षाचा पुढचा भाग चेपला जावून रिक्षा चालक श्रीराम गंभीर दुखापत होवून जागीच मृत्यूमुखी पडला. तर रिक्षात मागे बसलेल्या मुन्ना शेख आणि साक्षी जखमी झाले. अपघाताची माहिती चौक पोलीस दूरक्षेत्र येथे दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहचले. रिक्षा चालक श्रीराम राणेचा मृतदेहाचे खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाईकांच्या हवाली करण्यात आला असून पोलीस पुढील तपास करित आहेत.

**मेडिको इंटरकॉनटीनेन्टल लिमिटेड**

**(पूर्वी `इंटरकॉनटीनेन्टल लिजिंग अँड फायनान्स कंपनी लिमिटेड` ज्ञात)**

सीआयएनः एल५११००एमएच१९८४पीएलसी२६९७०७

ई-मेलः roc.iclf@gmail.com

**नोंदणी. कार्या.:** डीबीएस बिझनेस सेंटर, २१३, रहेजा चेम्बर्स, २ रा मजला, फ्री प्रेस जर्नल रोड, नरीमन पॉइंट, मुंबई – ४०००२१ दूरः ०२२-४०५०९४९३

**ई-मेलः** mail@medicointercontinental.com;

**संकेतस्थळः** www.medicointercontinental.com

**अतिरिक्त सर्वसाधारण सभेची सूचना**

ह्याद्वारे सूचना देण्यात येते की कंपनीची अतिरिक्त सर्वसाधारण सभा शनिवार, मार्च २३, २०१९ रोजी सकाळी १०.०० वा. डीबीएस बिझनेस सेंटर, २१३, रहेजा चेम्बर्स, २ रा मजला, फ्री प्रेस जर्नल रोड, नरीमन पॉइंट, मुंबई – ४०००२१ येथील कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये ईजीएम सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या व्यवसायाच्या विषयांवर विचार करण्यासाठी घेण्यात येणार आहे. कंपनीने ईजीएम च्या सूचना सभासदांना पाठविण्याचे काम बुधवार, फेब्रुवारी २८, २०१९ रोजी पूर्ण करणे आले आहे. कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन ) नियमावली, २०१४ च्या नियम २० सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १०८ च्या मान्यतेच्या अनुसार आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंट्स) नियमावली, २०१५ च्या नियम ४४ च्या मान्यतेच्या अनुषंगाने सुचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व ठरावांवर त्यांच्या सभासदांना मतदान करता यावे ह्यासाठी नॅशनल डिपोझितटरी लिमिटेड (एनएसडीएल) द्वारे ईजीएम च्या ठीकानाशिवाय अन्यत्र कोणत्याही भागामधून मतदान करण्यसाठी दूरस्थ ई-मतदान प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. सभासदांचे मतदानाचे प्रमाण त्यांनी शनिवार, मार्च १६, २०१९ (कट ऑफ दिनांक) अनुसार धारण करण्यात आलेल्या समभाग भागांच्या प्रमाणामध्ये निश्चित करण्यात येईल. ई-मतदानाचा कालावधी बुधवार, मार्च २०, २०१९ (सकाळी ९.०० वा. आयएसटी) रोजी सुरु होईल आणि शुक्रवार, मार्च २२, २०१९ रोजी (सायं. ५.०० वा. समाप्त) होईल. सदर कालावधी सभासद त्यांचे मत इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदान करू शकतात. नमूद कालावधीच्या नंतर ई-मतदान प्रणाली काढून टाकण्यात येईल. मतदानासाठी ई-मतदान प्रणाली सोबत ईजीएमच्या ठिकाणी मतदान पत्रिकेद्वारे देखील मतदान करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र ज्यांनी ई-मतदान प्रणाली द्वारे मतदान केले आहे त्यांना ईजीएमच्या ठिकाणी परत मतदान करता येणार नाही. ज्या सभासदानी कट ऑफ दिनांकाच्या अनुसार भाग धारणा केलेली आहे त्यांना त्यंचे युजर आयडी आणि पासवर्ड एनएसडीएल ह्यांच्याकडून प्रपात करता येईल. इलेक्ट्रॉनिक पद्धतीद्वारे मतदानाच्या संदर्भात जर कोणतीही समस्या असल्यास www.evoting.nsdl.com ह्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या डाऊनलोड विभागामधील एफएक्यूचा संदर्भ घेता येईल. तसेच टोल फ्री क्र. १८००-२२२-९९० वर किंवा evoting@nsdl.com वर मेल करून प्राप्त करता येईल. अधिक माहितीसाठी पल्लवी म्हात्रे, सहाय्यक व्यवस्थापक, एनएसडीएल, ४ था मजला, ए विंग, ट्रेड वर्ल्ड, कमला मिल्स कंपाउंड सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०००१३, ई-मेलः evoting@nsdl.com / pallavi@nsdl.co.in तसेच दूरः ९१ २२ २४९९ ४५४५ / १८०० २२२ ९९० वरून प्राप्त करता येईल. ईजीमचा तपशील कंपनीच्या www.medicointercontinental.com आणि एनएसडीएल च्या www.evoting.nsdl.com आणि बीएसई च्या www.bseindia.com ह्या संकेतस्थळावर देखील उपलब्ध आहे.

**संचालक मंडळाच्या आदेशांद्वारे**
**मेडिको इंटरकॉनटीनेन्टल लिमिटेड, करीता**
**(पूर्वी `इंटरकॉनटीनेन्टल लिजिंग अँड फायनान्स कंपनी लिमिटेड )**
**सही/-**
**समीर शाह**
**व्यवस्थापकीय संचालक**

**ठिकाणः मुंबई**
**दिनांकः २८/०२/२०१९**

**यूनियन बैंक ऑफ इंडिया** Union Bank of India
अच्छे लोग, अच्छा बैंक Good people to bank with

**नेपियन सी रोड शाखा**
मनीषा ६९-ए, पेटीट हॉल समोर, नेपियन सी समोर, मुंबई – ४००००६
दूरध्वनीः ०२२ – २३६९८५२२
जोडपत्र IV

**कब्जा सूचना**

**(नियम ८-१) (स्थावर मालमत्तेसाठी)**

ज्याअर्थी,

**युनियन बँक ऑफ इंडिया, नेपियन सी रोड शाखा,** चे निम्नस्वाक्षरीकार हे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरीटायझेशन अँड रिकंस्ट्क्शन ऑफ फायनन्शियाल असेट अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट , २००२ (५४/२००२) च्या अंतरगत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली, २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारणाचा वापर करून **मे. डॉल्फिन क्लोदिंग, श्री. दिनेश जैन, श्रीमती ममता दिनेश जैन आणि श्री. निलेश दिनेश जैन** ह्यांना सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेली रक्कम **रु. १३,६९,९५,२८८/- (रुपये तेरा कोटी एकूणसत्तर लक्ष पंच्याणव हजार दोनशे अठ्ठ्याऐंशी मात्र)** आणि त्यावरील व्याजाचा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करण्यासाठी डिमांड नोटीस दिनांकित २६.०६.२०१८ जारी करण्यात आली होती.

कर्जदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे कर्जदार आणि सामान्य जनता ह्यांना ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की येथे खाली नमूद करण्यात मालमत्तेचा सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियामावली, २००२ च्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३(४) च्या अंतर्गत त्याना/ तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून निम्नस्वाक्षरीकार ह्यांनी **२६ फेब्रुवारी २०१९ रोजी** सांकेतिक ताबा घेतला आहे.

कर्जदार हे रकमेचा भरणा करू न शकल्यामुळे कर्जदार आणि सामान्य जनता ह्यांना ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि जर असा व्यवहार झाला असल्यास युनियन बँक ऑफ इंडिया, नेपियन सी रोड शाखा मुंबई ह्यांच्याकडे **रु. १३,६९,९५,२८८/-** आणि त्यावरील व्याजाचा भरणा करण्यास बाध्य असतील.

सुरक्षित मालमत्ता सोडविण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात नमूद कायद्याच्या कलम १३ च्या पोटकलम (८) च्या अंतर्गत असलेल्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**

| |
|---|
| (अ) गाळा क्र. ३१२, ए/२, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. जे. मार्ग, लोअर परेल |
| (बी) गाळा क्र. ३४४, ए/२, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. जे. मार्ग, लोअर परेल |
| (सी) गाळा क्र. ३४५, ए/२, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. जे. मार्ग, लोअर परेल |
| (डी) गाळा क्र. ४६५, ए/२, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, एस. जे. मार्ग, लोअर परेल |
| (ई) गाळा क्र. १०१ ते ११०, इंडियन कॉर्पोरेशन कंपाउंड, माणकोली नाका, दापोडे गाव, भिवंडी |
| (एफ) गाळा क्र. २०१ ते २१०, इंडियन कॉर्पोरेशन कंपाउंड, माणकोली नाका, दापोडे गाव, भिवंडी |

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**युनियन बँक ऑफ इंडिया**

**दिनांकः २६/०२/२०१९**
**ठिकाणः मुंबई**

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था (परसेवा), मुंबई यांचे कार्यालय**
**दि बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स् असोसिएशन लि., मुंबई**
भारतीय क्रीडा मंदिर, ४ था मजला, सहकार नगर जवळ, नायगांव रोड नं. २६, मुंबई-४०० ०३१.

**जाहीर नोटीस**

**मंगल को-ऑप. बँक लि.** ... **अर्जदार**
१६८, जवाहरनगर, गोरेगाव (प)
मुंबई ४००१०४.

**अनुक्रमांक १ ते ४** ... **जाब देणार**

खालील दर्शविलेल्या विषयासंदर्भात जाब देणाऱ्यांना नोटीस देण्यात येते की, थकित कर्जाविषयी अर्जदार बँकेने **महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली वसुली दाखला** मिळणेसाठी दाखल केलेल्या अर्जाबाबत तुमचे म्हणणे सादर करण्यासाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण रहात नसल्याने तसेच आपला विद्यमान पत्ता उपलब्ध नसल्याने सदर जाहीर नोटीसीद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून **दि. २७.०३.२०१९** रोजी **दुपारी १२.००** वाजता आपण स्वतः वरील पत्त्यावर हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण लक्षपूर्वक नोंद घ्यावी.

जाब देणार आणि दाखल केलेल्या दाव्यांची माहिती खालीलप्रमाणेः-

| अ. क्र. | जाब देणाऱ्याचे नाव | जाब देणार क्र. | अर्ज दाखल दिनांक | दावा क्रमांक | दावा रक्कम रुपये | पुढील सुनावणी तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मे. गुरूदेव एंटरप्रायजेस. प्रोप्रा. श्री. रमेश कुमार रामनेश मिश्रा | १ | | | | |
| २ | श्री. कुमकुम रतनेश कुमार मिश्रा | २ | ३१.१.१९ | २७/१९ | १८,३७,८५६/- | २७.०३.१९ |
| ३ | श्री. आनंदकुमार शंकर राय | ३ | | | | |
| ४ | श्री. सुभाषचंद्र एस. पांडे | ४ | | | | |

ही नोटीस आज **दिनांक २७.०२.२०१९** रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

सही/-
**(विलास गावडे)**
मे. उपनिबंधक, सहकारी संस्था
**महाराष्ट्र शासन, मुंबई (परसेवा)**

शिक्का